Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
दैनिक
# महाराष्ट्र सम्राट

अग्रलेख

**केमिकल कंपन्यांवर कारवाई करा**

डोंबिवली येथील एमआयडीसिमधील एका केमिकल कंपनीत स्फोट होऊन सहा कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर ४८ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी .....पान २ वर

तुम्ही रोज मासे खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल? ...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७१,०१० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार




साहेब, या मुलांनी कारने दुचाकीला ठोकले आणि वाहतूक सुरक्षेबद्दल निबंधही लिहून आणला आहे. त्यांना सोडून देऊ काय ?

# उन्हाच्या झळा तीव्र, ठाणेकर घामाघुम...त्वचा विकारात वाढ

**ठाणे : उन्हाच्या झळा आणखी तीव्र होणार असल्याने ठाणेकर अधिकच घामाघुम झाले असून, त्यामुळे त्वचा विकार वाढीस लागले आहेत. सर्वसाधारण घामोल्याने भलतेच हैराण झाले आहेत. सिव्हील रुग्णालयात त्वचा विभागात सर्वाधिक घामोळ्याच्या रुग्णांची संख्या जास्त असून, शरीराला जास्तीत जास्त थंडावा देण्याचा प्रयत्न ठेवावा, बाहेर फिरताना भरपूर पाणी, अंगावर सुती कपडे, हिरव्या पालेभाज्या, पाणीदार फळ खाण्याचा सल्ला त्वचातज्ज्ञांनी दिला आहे.**



अवकाळी पाऊस-गारपीठ यामुळे ऋतूचक्रच बिघडल्याचा भास होत असला तरी ठाण्यात उष्म्याचा पारा वाढला आहे. जसा पाऊस जवळ येतो आहे तशी उन्हाची दाहकता अधिक वाढणार आहे. उन्हात फिरल्यामुळे डोळ्यांची जळजळ, पोटात मळमळ, डोके दुखणे अशा गोष्टी नित्याच्याच झाल्या असल्या तरी त्वचाविकारांचे आजारही तेवढेच वाढले आहेत. मात्र सर्वाधिक घामोळ्याने अनेकजण त्रस्त आहेत. ठाणे सिव्हील रुग्णालयात घामोळ झाल्याने उपचारासाठी रुग्ण येत असल्याची माहिती. वरिष्ठ त्वचा तज्ज्ञ डॉ. कमलाकर जावळे यांनी दिली.

या दिवसांमध्ये नागरिकांनी भरपूर पाणी पीणे आवश्यक आहे. अंगावर सुती फिकट रंगाचे कपडे, दिवसातून दोन वेळा थंड पाण्याने आंघोळ करणे, टोपी, गॉगल, सनस्क्रिन लोशन लावणे, अंगावर घाम सुकणार नाही याची काळजी घेणे, मसालेदार पदार्थ खाऊ नये, मांसाहार कमी करावा, असून दुपारी घरातून बाहेर पडताना भरपूर पाणी पिऊन मगच बाहेर पडावे.

**– डॉ. कैलास पवार (जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे)**

प्रदूषण, धूळीबरोबरच हवामानातील उष्म्याची दाहकता वाढून त्याचा विपरित परिणाम त्वचेवर होतो. या दिवसात त्वचा विकारामध्ये फंगल इन्फेक्शन, घामोळे, अंगावर फोड-रेषा उमटणे गजकर्ण, नायटा सारख्ये त्वचा विकार होतो.


**– डॉ. कमलाकर जावळे (वरिष्ठ त्वचा तज्ज्ञ, सिव्हील रुग्णालय)**



दुपारच्या रणरणत्या उन्हात अनेकांना रस्त्यावरचे लिंबू-मँगो सरबत पिण्याचा मोह आवरत नाही. परंतु हे सरबत आरोग्यासाठी अपायकारक असण्याची शक्यता असते. अशा वेळी घरा बाहेर पडताना स्वत: जळव थंड पाण्याची बाटली अथवा लिंबूसबताची बाटली सोबत ठेवावी. नारळपाणी, कलिंगड, खरबूज, तोडगोळा सारख्या फळांचा सेवन करा.

# डोंबिवली एमआयडीसीमध्ये बॉयलरचा भीषण स्फोट

**३ ते ४ किमीपर्यंत स्फोटाचा आवाज**





**डोंबिवली एमआयडीसीच्या फेज २ मध्ये झालेल्या भीषण स्फोटामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. डोंबिवली एमआयडीसीमध्ये असलेल्या अमुदान केमिकल कंपनीत बॉयलरचा स्फोट झाला. या भीषण स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ४८ जण जखमी झाले आहेत. हा स्फोट इतका भीषण होता की आजूबाजूला काही किलोमीटरवर असलेल्या इमारती, दुकानांच्या काचा फुटल्या. सध्या अग्निशमन दलाच्या जवानांकडून कुलिंग ऑपरेशन सुरु आहे.** (सविस्तर वृत्त पान २ वर)



**6 जणांचा होरपळून मृत्यू**

**48 जण जखमी**

डोंबिवलीतील कंपन्या अंबरनाथमध्ये हलवणार’



**– मुख्यमंत्री शिंदेंची घोषणा**

**धुराचे प्रचंड लोट, इमारतीच्या काचा फुटल्या**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका भविष्यात स्मार्ट सिटी कडे वाटचाल करीत असून.. स्मार्ट सिटी होण्याअगोदर आपले शहर अस्वच्छ, गलिच्छ आणि बकाल राहिले तरी.काय कोणाला फरक पडतोय! स्मार्ट सिटीचे कामे संथ गतीने सुरू आहेत. कामांतर्गत या शहरात काय होणार आहे. हे पालिका प्रशासनाला आणि कार्यरत ठेकेदार कंपनीलाचं माहिती. स्मार्ट सिटीच्या कामामुळे शहर प्रदूषित होत असून सर्वसामान्य करदात्या मतदात्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे.**

केंद्र सरकारच्या भारत स्वच्छ अभियानांतर्गत मागील दोन वर्षांपूर्वी स्वच्छतेचा देश पातळीवरचा पुरस्कार.. मिळूनही कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाला अजूनही शहाणपण आलेले दिसत नाही आहे.

**आता तरी प्रशासनाला जागा येईल का?**

## कल्याण पश्चिम जरीमरी नाला की, पालिकेचा कचरा डम्पिंग ग्राउंड

■ **पावसाळ्यात समस्या अधिक वाढते –** सर्वत्र पावसाळ्याची पूर्वतयारी म्हणून गटारी, नाले-सफाईला कधी सुरुवात होनार, अद्याप तरी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला जाग आलेली दिसत नाही. पावसाळा येऊ द्या... फेब्रुवारी ते एप्रिल पासून जरीमरी नाला व इतर नाले प्लॅस्टिकच्या कचऱ्याने तुडुंब भरून वाहत आहे. कल्याण डोंबिवली शहरामध्ये आयुक्तांच्या आदेशानुसार प्लास्टिक वर बंदी असूनही कचऱ्याच्या गाळात उभे राहून कचरा वेचक मंडळी आपला उदरनिर्वाह चालवत आहेत प्लास्टिक पिशव्यांचा वापर मात्र सर्रास सुरू आहे.

■ **पालिकेची प्लास्टिक बंदी..** दुकानदारांना अभय देणारी ठरत आहे. संबंधित प्रभागातील सहाय्यक आयुक्त काय करत आहेत दरवर्षीप्रमाणे गटार-मोठ-मोठे-नाले सफाई करण्यासाठी पालिकेतील संबंधित विभाग करोडो रुपयांचा चुराडा करते तरी पालिका हद्दीत जल-मल गटारी, रुग्णालये, स्कायवॉक, रस्ते, वाहतूक बेटे, बगीचे, चौक मैदाने भाजी-मच्छी मंडई सर्व काही अत्यंत गलिच्छ व अस्वच्छ!

**थोडक्यात घडामोडी**

## कोथिंबीर जुडी ७५ रुपये तर मेथी जुडी ५० रुपये

नाशिक : मे महिना सरत आला तरी पावसाचा पत्ताच नसल्याने त्याचा परिणाम आता भाजीबाजारावर स्पष्ट जाणवू लागला आहे. सकाळच्या नाश्त्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत कोणत्याही पदार्थाची लज्जत वाढवणारी कोथिंबीर सध्या नाशिकमध्ये 'भाव' खात असून ७५ रुपयाच्या भावाने विकली जात आहे. त्यामुळे गृहिणीचे भाजीपाल्याचे रोजचे बजेट कोलमडले आहे. शहरातील विविध भाजी बाजारात भाजीपाल्याच्या दरात मोठी वाढ झाल्याने शेतकरी वर्गाला काहीसा दिलासा मिळत असला तरी ग्राहकांच्या खिशाला मात्र कात्री लागली आहे.

कोथिंबीर ही प्रत्येकाच्या घरात वापरलीच जाते. पण आता याच कोथिंबिरीचा दर गगनाला भिडला असून कोथिंबीर जुडी थेट ७५ रुपयांना विकली जात आहे. शेतीतील उभ्या पिकांना पाणी कमी पडू लागल्याने शेतीमालावर परिणाम होत आहे.नाशिक बाजार समिती ५०% शेतमालाची आवक झाली आहे. शेतमालाची आवक घटल्याने बाजार भाव तेजीत आहेत. अशातच (पान २ वर)

## काँग्रेसच्या स्नेहभोजनात बंडखोर विशाल पाटलांची उपस्थिती



सांगली - सांगली लोकसभा मतदार संघ पहिल्यापासूनच चांगलाच चर्चेत राहीला आहे. खास करू महाविकास आघाडीत या मतदार संघावरून चांगलीच ओढाताण सुरू होती. शेवटी हा शिवसेना ठाकरे गटाच्या पारड्यात हा मतदार संघ पडला. पण सर्व काही तिथेच थांबले नाही. काँग्रेसच्या विशाल पाटील यांनी बंडखोरी करत निवडणूक लढवली. काँग्रेसने आपण महायुतीच्या उमेदवारा बरोबरच असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात पडद्यामागे काही दुसरेच सुरू होते. त्याचाच प्रत्यय आता पुन्हा एकदा आला आहे. निवडणूक आटोपल्यानंतर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. याला माजी मंत्री विश्वजीत कदम, जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी (पान २ वर)

**कोणीही वेगळा अर्थ काढू नये – जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी केले स्पष्ट**

या सर्वातून कोणीही वेगळा अर्थ काढू नये असे जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी स्पष्ट केले आहे. विश्वजीत कदम यांच्या नेतृत्वावर आम्ही काम करत आहोत. तर विशाल पाटील हे प्रदेश काँग्रेसचे अजूनही उपाध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांना निमंत्रीत करण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीत सांगलीची जागा काँग्रेसला मिळाली नाही. त्यामुळे कार्यकर्ते नाराज होते. आगामी काळात विधानसभा निवडणुका आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी एक राहावे. शिवाय झपाट्याने काम करावे या उद्देशाने हे स्नेहभोजन आयोजित केल्याचेही ते म्हणाले.

## ईव्हीएमच्या स्ट्राँगरुमबाहेर उमेदवारांच्या कार्यकर्त्यांचा २४ तास खडा पहारा...

**ठाणे लोकसभा मतदारसंघाचे मतदान सोमवारी पार पडल्यानंतर सर्व ईव्हीएम मशीन्स घोडबंदर येथील न्यू होरायझन स्कूलमध्ये उभारलेल्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवल्या आहेत. या स्ट्राँग रूममध्ये कोणतीही गडबड होऊ नये म्हणून सर्वपक्षीय उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी २४ तास खडा पहारा देण्यास सुरुवात केली आहे. निवडणूक यंत्रणेची त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणा असली तरी सर्व पक्षांचे कार्यकर्ते न्यू होरायझन स्कूलवर डोळ्यांत तेल घालून वॉच ठेवत आहेत. ४ जून रोजी मतमोजणी होणार असून तोपर्यंत कार्यकर्त्यांची करडी नजर राहणार आहे.**




राज्यात निवडणुकांचे पाच टप्पे संपताच मतदान झालेल्या ईव्हीएम मशीनच्या स्ट्राँग रूमवरून तक्रारी येण्यास सुरुवात झाली. सीसीटीव्ही अचानक बंद होणे, संवेदनशील भागात अज्ञात व्यक्तींच्या हालचाली तसेच येथील विद्युत पुरवठा खंडित होण्याच्या घटना राज्यातील विविध भागांत घडल्या होत्या. त्याची पुनरावृत्ती ठाण्यात होऊ नये म्हणून

**ईव्हीएम मशीनची जबाबदारी तीन दलांच्या खांद्यावर**

मतदानानंतर मतमोजणीसाठी १५ दिवसांचा कालावधी असल्याने ईव्हीएम मशीन सुरक्षित राहण्यासाठी स्ट्राँग रूम तयार केले आहे. त्या स्ट्राँगरूमची जबाबदारी १२८ केंद्रीय निमलष्करी दल, राज्य राखीव पोलीस दल यांच्यासह स्थानिक पोलीस अशा तीन दलांच्या खांद्यावर आहे.

मतदान यंत्रे ठेवलेल्या स्ट्रांग रूमचे सीसीटीव्ही प्रक्षेपण उमेदवारांच्या प्रतिनिधींनाच पाहता येणार आहे. दरम्यान निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या (पान २ वर)

# फिर से दिखाऊंगा सड़क पे खेल

**बिल्डरपुत्राचा माज,अपघातानंतर चीड आणणारं कृत्य, बेल मिळाल्यानंतर शिवीगाळ करणारं रॅप**



**पुणे: कल्याणीनगरातील पोर्शे कार अपघातात, बिल्डरपुत्रानेअपघातानंतर संतापजनक कृत्य केल्याचं समोर आलं आहे. दोन तरुणांचा जीव घेतल्यानंतर, विधीसंघर्ष मुलाला अटक केल्यानंतर काही तासातच जामीन मिळाला होता. हा जामीन मिळाल्यानंतर या तरुणाने चक्क रॅप साँग तयार केलं आणि शिवीगाळ करणारं रॅप साँगचा सेल्फी व्हिडीओ स्वत: शूट केला. या रॅप साँगमध्ये प्रचंड शिवीगाळ तर आहेच, पण चीड, संताप, येईल असे शब्द त्याने उच्चारले आहेत. विशाल अग्रवाल यांच्या या मुलाच्या कृत्याने समाजात संतापाची लाट उसळली आहे.**

दै. महाराष्ट्र सम्राट या व्हिडीओची पुष्टी करत नाही. पोलिसांनी तसेच या मुलाच्या कुटुंबीयांनीदेखील हा व्हिडीओ त्याचा नसल्याचं सांगितलं आहे. हा व्हिडीओ डीपफेक आहे का, एआयच्या वापर करून तो तयार करण्यात आला आहे का याचा तपास पुणे पोलिसांनी सुरू केला आहे. बिल्डरचा मुलगा आहे म्हणून मला एका दिवसात बेल मिळाल्याचं सांगत त्या अल्पवयीन आरोपीने शिवीगाळ केल्याचं दिसतंय. त्यानंतर त्याने रॅप साँग करत व्हिडीओ केला. पण हा व्हिडीओ डीप फेक असू शकतो, त्या मुलाचा नसू शकतो अशीही शक्यता वर्तवली आहे. व्हायरल होणारा हा व्हिडीओ एआय टूल वापरून तयार केला असल्याची शक्यता पुणे पोलिसांनी वर्तवली आहे.

**काय आहे मुलाच्या रॅप साँगमध्ये?**

*मिली बेल, फिर से दिखाऊंगा सडक पे खेल,*
*चार यार मेरे साथ, सिधे फाड देते गां+++*
*करके बैठा मै नशे...*
*इन माय पोर्शे*
*सामने आया कपल मेरे*
*अब वो है निचे*
*साऊंड सो क्लिंचे*
*सॉरी गाडी चढ आप पे*
*१७ साल की उमर*
*पैसे मेरे बाप पे*
*१ दिन में मिल गयी मुझे बेल*
*फीर से दिखा दुंगा सडक पे खेल*
*प्लेइंगद केरोसिन फोन्क इन माय नेक्स्ट स्पोर्ट्स कार*

## अल्पवयीन मुलाची बालसुधारगृहात रवानगी

पुण्यातल्या कल्याणीनगर रॅश ड्रायव्हिंग प्रकरणातल्या अल्पवयीन मुलाचा जामीन बाल न्याय मंडळाने रद्द केला आहे. बाल न्याय मंडळात बुधवारी ८ तासांहून अधिक वेळ सुनावणी झाली. या मुलाची आता ५ जूनपर्यंत बालसुधारगृहात रवानगी होणार आहे. तसंच मुलगा सज्ञान आहे की अल्पवयीन हे पोलीस तपासानंतर ठरवलं जाईल. तोवर मुलाला बालसुधारगृहातच राहावं लागणार आहे.

अपघातानंतर या मुलाला तातडीने मिळालेल्या जामिनानंतर प्रचंड रोष निर्माण झाला होता. स्वतः गृहमंत्री फडणवीसांनी पुण्यात जात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी चर्चा केली होती. मुलगा १७ वर्षे ८ महिन्यांचा असल्यामुळे निर्भया प्रकरणानंतरच्या सुधारित ऑर्डरनुसार आरोपी अल्पवयीन असल्यास त्याला काही प्रकरणात सज्ञान आरोपीनुसार कारवाई करता येते हा मुद्दा पोलिसांनी कोर्टात मांडला. तसंच पोलिसांनी अल्पवयीन मुलावर वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत नव्यानं गुन्हा दाखल केला आणि त्याला पुन्हा कोर्टात हजर केलं. बाल न्याय मंडळाने आता त्याचा जामीन रद्द करत बालसुधारगृहात रवानगी केलीय.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## केमिकल कंपन्यांवर कारवाई करा

डोंबिवली येथील एमआयडीसिमधील एका केमिकल कंपनीत स्फोट होऊन सहा कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर ४८ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी विविध खासगी रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. नागरिकांना या घटनेचा मोठ्या प्रमाणावर त्रास झाला. या दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढण्याची भीती आहे. उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार श्रीकांत शिंदे यांनी घटनास्थळी जाऊन बचावकार्याची माहिती घेतली आणि पुढील निर्देश दिले. डोंबिवली एमआयडीसीमध्ये रासायनिक कंपन्यांचे प्रस्थ मोठ्या प्रमाणात आहे. परंतु गेल्या दोन वर्षांत या कंपन्यांचे फायर ऑडिट झालेले नाही. त्यामुळे येथील कंपन्या बंद कराव्यात आणि संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

डोंबिवलीतील एमआयडीसी फेज दोनमध्ये अंबर केमिकल कंपनीत काल कंपनीच्या बॉयलरचा स्फोट झाला. हा स्फोट एवढा भयानक होता की, स्फोटाचे हादरे तीन ते चार किलोमीटर परिसरात जाणवले. यामुळे इमारतींच्या काचाही फुटल्या तसंच काही चारचाकी गाड्यांचेही नुकसान झाले. आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु होते. परंतु धुराचे लोट आणि आगीचे लोळ मोठ्या प्रमाणावर असल्याने बचाव कार्यात अडथळे येत होते. या घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. परंतु मंत्र्यांच्या वक्तव्यामध्ये फरक दिसून येतो. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तीन मृत्यू झाल्याची माहिती दिली होती. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेत सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे.

कंपनीच्या बॉयलरमध्ये भीषण स्फोटानंतर एमआयडीसीतून बाहेर पडलेल्या एका कामगाराने सांगितले की, स्फोट झाला ती आमच्या बाजूची कंपनी होती. इतका मोठा स्फोट होता की, आम्ही सगळे बाहेर पडलो. सगळे आगीचे लोळ येत होते. आमच्या हाताला भाजले आहे. अनेकांच्या घरांच्या काचेच्या खिडक्या फुटल्या आहेत. अग्निशमन दलाकडून अतिरिक्त कुमक मागवून आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु होते.

डोंबिवली एमआयडीसीमध्ये व परिसरात अनेक केमिकल कंपन्या आहेत. अनेकवेळा या कंपन्यांमध्ये अनेक दुर्घटना घडल्या आहेत. परंतु या कंपन्यांवर तेवढ्यापुरातीच कारवाई होते. पुन्हा या कंपन्यांमध्ये सावळागोंधळ होतो. या कंपन्यांचे फायर ऑडिटही दोन वर्षे केलेले नाही, अशीही माहिती मिळत आहे. अतिधोकादायक रसायने तयार करणाऱ्या कंपन्या शहराच्या बाहेर नेल्या जाव्यात अशी मागणी स्थानिकांकडून केली गेली आहे. परंतु विद्यमान राज्य सरकार हे मनावर घेणार काय, असा प्रश्न अनुत्तरित आहे. येत्या काही महिन्यांत इथल्या अतिधोकादायक केमिकल तयार करणाऱ्या कंपन्या शहराबाहेर कशा नेता येतील यावर आम्ही लक्ष केंद्रीत करणार आहोत, असे विद्यमान खासदार श्रीकांत शिंदेंनी म्हटले आहे.

डोंबिवलीतल्या एमआयडीसी भागातील सोनारपाडा या ठिकाणी अंबर केमिकल कंपनीत स्फोट होऊन जीवितहानी झाली आहे. त्यामुळे कंपनी मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची गरज आहे. कंपनीतील स्फोटामुळे एमआयडीसी निवासी विभागांतील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या दुर्घटनेची गंभीर दखल राज्य सदकाराने घ्यावी, अशी अपेक्षा.

# बुध्दपौर्णिमेनिमित्त पनवेल महानगरपालिका आयोजित विविध स्पर्धेतील यशस्वी विजेत्यांना बक्षीस वितरण




■ कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर जगदीश गायकवाड यांची उपस्थिती...

**पनवेल,दि.२३ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महापालिकेने लोकसहभागातून विविध स्पर्धांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरी केली होती. आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेतील विजेत्यांना बुद्धपर्णिमेनिमित्ताने आंबेडकर भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी विजेत्यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सनमानीत करण्यात आले.**

यावेळी उपायुक्त कैलास गावडे, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, माजी नगरसेवक अनिल भगत, प्रकाश बिनेदार, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, सामान्य प्रशासन विभागप्रमुख दशरथ भंडारी, महापालिका अधिकारी अनिल कोकरे, शैलेश गायकवाड, किर्ती महाजन, नामदेव पिचड, महापालिका शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, बहुजन पंचायत समिती १ चे सदस्य अनिल जाधव, महेश साळुंखे, नरेंद्र गायकवाड, भांडारपाल प्रकाश गायकवाड, विविध शाळांचे



विद्यार्थी व शिक्षक, नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकांध्ये उपायुक्त कैलास गावडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महापालिकेच्यावतीने यावर्षी घेण्यात आलेल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धांना महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळांनी सहभागी झाल्याबद्दल आभार मानले तसेच पुढील वर्षी यावर्षी पेक्षा मोठ्या प्रमाणावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणुकीसाठी देणगी दिलेल्या देणगीदारांचे सत्कार करण्यात आले तसेच मान्यवरांच्या हस्ते चित्ररथ, निबंध व वक्तृत्व स्पर्धेत यश मिळवलेल्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महापालिकेच्या शिक्षण विभागातील सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचेही पुष्पगुच्छ देऊन आभार मानण्यात आले.

# डोंबिवलीतील MIDC स्फोटात ६ जणांचा होरपळून मृत्यू, ४८ जण जखमी

कल्याण - डोंबिवली एमआयडीसीच्या फेज २ मध्ये झालेल्या भीषण स्फोटामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. डोंबिवली एमआयडीसीमध्ये असलेल्या अमुदान केमिकल कंपनीत बॉयलरचा स्फोट झाला. या भीषण स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ४८ जण जखमी झाले आहेत. हा स्फोट इतका भीषण होता की आजूबाजूला काही किलोमीटरवर असलेल्या इमारती, दुकानांच्या काचा फुटल्या. सध्या अग्निशमन दलाच्या जवानांकडून कुलिंग ऑपरेशन सुरु आहे.

### ३ ते ४ किमीपर्यंत स्फोटाचा आवाज

डोंबिवली परिसरातील एमआयडीसीच्या फेज २ मध्ये असलेल्या अमुदान केमिकल कंपनीत दुपारी दीड ते दोनच्या सुमारास मोठा स्फोट झाला. त्यानंतर काही वेळातच आगीचे व धुराचे लोळ सर्वत्र परसले. यावेळी बॉयलरमध्ये स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. या स्फोटाची तीव्रता इतकी भीषण होती की डोंबिवलीतील रहिवाशी इमारतीतील खिडक्यांच्या काचा फुटल्या. तसेच परिसरातील दुकानांच्या काचा फुटल्याचेही पाहायला मिळाले. त्यामुळे डोंबिवलीतील रस्त्या-रस्त्यावर काचांचा खच पडला होता.

### आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू

त्यासोबतच या बॉयलरच्या स्फोटाचा आवाज ३ ते ४ किलोमीटरपर्यंत ऐकू आला. तसेच आजूबाजूच्या घरांच्या, हॉटेल्स आणि ऑफिसच्या काचा फुटल्याचे व्हिडीओ आणि फोटोही समोर आले. या घटनेनंतर अग्निशमन दलाच्या ५ ते ६ गाड्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी अग्निशमन दलाच्या जवानांना आगीवर नियंत्रण आणण्यासाठी सुरुवातीला अडथळा येत होता. आगीची तीव्रता भीषण आणि धुराचे लोळ परिसरात पसरत असल्याने त्यांना आग विझवताना मोठी कसरत करावी लागली. डोंबिवलीतील या भीषण स्फोट दुर्घटनेत आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाला आहे.

### ४८ पेक्षा अधिक कामगार जखमी

तर तब्बल ४८ पेक्षा अधिक कामगारांना गंभीर दुखापत झाली आहे. सध्या डोंबिवलीतील एम्स रुग्णालयात ४० जणांवर उपचार सुरु आहे. तर नेपच्यून रुग्णालयात १५ जणांवर उपचार सुरु आहेत. मंत्री उदय सामंत यांनी डोंबिवली MIDC येथील दुर्घटनास्थळी भेट देऊन मदतकार्याचा आढावा घेतला. या दुर्घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकारतर्फे करण्यात येणार आहे. या दुर्घटनेची संपूर्ण चौकशी केली जाईल, अशी माहितीही मंत्री सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### अमुदान केमिकल कंपनीत भीषण स्फोट

मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली एमआयडीसी फेज २ मध्ये असलेल्या अमुदान केमिकल कंपनीत सुरुवातीला भीषण स्फोट झाला. त्यानंतर ही आग आजूबाजूला असलेल्या कंपन्यांमध्ये पसरत गेली. यात मेहता पेंट, के.जी.एन केमिकल, सप्त वर्ण, हुंडाई शो रूम आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. यावेळी हुंडाई शो रुममधील १० ते १२ गाड्याही जळून खाक झाल्या.

### उपचाराचा खर्च सरकार करणार

मंत्री उदय सामंत यांनी डोंबिवली MIDC येथील दुर्घटनास्थळी भेट देऊन मदतकार्याचा आढावा घेतला. या दुर्घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकारतर्फे करण्यात येणार आहे. या दुर्घटनेची संपूर्ण चौकशी केली जाईल, अशी माहितीही मंत्री सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### ९ वर्षांपूर्वीच्या स्फोटाची आठवण

२६ मे २०१६ रोजी एमआयडीसी फेज २ मधील प्रोबेस कंपनीत स्फोट झाला होता. या घटनेची तीव्रता अधिक असल्याने कंपनीत काम करणाऱ्या १२ जणांना आपला जीव गमवावा लागला होता. तर, आजुबाजूच्या परिसरात राहणाऱ्या २१५ जणांच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते. त्यावेळी, कल्याण तहसील दाराकडून २६६० नुसार बाधितांच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते. पंचनामे झालेल्या मालमत्तेचा आकडा साधारणपणे ७ कोटी ४३ लाख सत्तर हजार रुपयांपर्यंतचा होता.

# उष्माघातामुळे कल्याण-डोंबिवलीत दोघांचा बळी

कल्याण - कल्याण-डोंबिवलीच्या शहर आणि ग्रामीण पट्ट्यात उष्णतेची लाटेसदृश्य परिस्थिती जाणवू लागली आहे. एकीकडे सूर्य आग ओकत असताना दुसरीकडे वनस्पती आणि प्राणीमात्रांना अग्निदिव्यातून जावे लागत आहे.

उष्णतेची लाट सर्वत्र उसळली असतानाच गेल्या दोन दिवसांत कल्याण-डोंबिवलीत उष्माघातामुळे दोन जणांचे बळी गेल्याचे वृत्त आहे. पोलिसांकडून या वृत्ताला दुजोरा मिळत आहे. तर उत्तरीय तपासणी अहवालावरून या दोघांच्या मृत्यूचे निश्चित कारण समजू शकणार असल्याचे केडीएमसीच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

विशेष म्हणजे डोंबिवली पूर्वेकडील गोग्रासवाडीत राहणाऱ्या एका महिलेचा मृतदेह इमारतीच्या गच्चीवर आढळून आल्याने परिसरात खळबळ माजली आहे. दोन दिवसांपूर्वी कल्याण रेल्वे स्थानकाजवळ एका तरूणाचा मृतदेह रस्त्यावर पडलेला आढळून आला होता. उष्माघाताने हे दोन्ही बळी गेल्याची माहिती प्राथमिक तपासात पुढे आली आहे.

गोग्रासवाडीत राहणाऱ्या शुभांगी खंदारे (वय ५५) राहत्या इमारतीच्या गच्चीवर मृतावस्थेत आढळून आल्या. याच इमारतीत राहणाऱ्या तरूण पेडणेकर याने ही माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी शुभांगी यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता केडीएमसीच्या रूक्मिणीबाई हॉस्पिटलला पाठवून दिला आहे.

## काँग्रेसच्या स्नेहभोजनात बंडखोर विशाल पाटलांची उपस्थिती

(पान १ वरून) उपस्थिती लावली. शिवाय काँग्रेस बंडखोर उमेदवार विशाल पाटील यांनीही आपल्या समर्थकांसह या कार्यक्रमाला हजेरी लावली त्यामुळे सर्वांच्याच भूवया उंचावल्या. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रहार पाटील यांना निमंत्रणही देण्यात आले नव्हते. त्यामुळे पुन्हा एकदा उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

सांगली लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेस कोणाच्या पाठीशी होती? हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. कारण काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी निवडणुकी प्रचारासाठी राबलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी श्रम परिहार म्हणून स्नेहभोजन आयोजित केलं होतं.विशेष म्हणजे या स्नेहभोजन सोहळ्याला काँग्रेसचे बंडखोर उमेदवार विशाल पाटील यांच्यासह काँग्रेस आमदार विश्वजीत कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. या निमित्ताने विशाल पाटील यांनी स्नेहभोजनासाठी आलेल्या कार्यकर्त्यांचे आभार देखील मानले आहेत.

स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाची पृथ्वीराज पाटील यांच्याकडून पत्रिका काँग्रेस कार्यकर्त्यांना पाठवली होती. ज्यामध्ये स्नेहभोजनाचे निमित्त आणि प्रमुख उपस्थिती असणाऱ्या विशाल पाटील आणि विश्वजीत कदम यांचे नावांचा उल्लेख होता. वास्तविक महाविकास आघाडीतील सांगली लोकसभेचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या पाठीशी काँग्रेस असल्याचा निवडणुकी दरम्यान काँग्रेसकडून वारंवार सांगण्यात आलं होतं. मग असं असलं तर श्रमपरिहाराच्या स्नेह भोजनाला चंद्रहार पाटलांच्या ऐवजी विशाल पाटलांची प्रमुख उपस्थिती कशी ? अशी चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

## ईव्हीएमच्या स्ट्राँगरुमबाहेर उमेदवारांच्या कार्यकर्त्यांचा २४ तास खडा पहारा...

(पान १ वरून) निर्देशानंतर जिल्हा प्रशासनाने ही मुभा दिली असून एकूण ६४ सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. सातारा आणि बारामती लोकसभा मतदारसंघात या स्ट्राँग रूमचे काही काळासाठी सीसीटीव्ही प्रक्षेपण खंडित झाल्याचा प्रकार समोर आला होता. तर बुधवारी नगर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार नीलेश लंके यांनी व्हिडीओ प्रसिद्ध करत येथील स्ट्राँग रूममध्ये एक व्यक्ती संशयास्पदरीत्या जात असल्याचे सांगितले. त्यामुळे या घटना लक्षात घेता ठाण्यात ईव्हीएम मशीन ठेवलेल्या ठिकाणी उमेदवारांचे कार्यकर्ते संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.

## कोथिंबीर जुडी ७५ रुपये तर मेथी जुडी ५० रुपये

(पान १ वरून) सर्वच भाज्यांत वापरल्या जाणाऱ्या कोथिंबीर जुडीने उच्चांक गाठला आहे.

**शेतमालाची आवक घटल्याने बाजार भाव तेजीत** - आवक कमी झाल्याने नाशिकमध्ये सध्या कोथिंबिरीला चांगला भाव मिळत आहे. बाजारात ७५ रुपयांनी कोथिंबीर जुडीची विक्री होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा होत असून सर्वसामान्यांनी मात्र तोंडात बोटे घातली आहेत. आठ दिवसांपासून दमटपणासह उकाड्यात वाढ होत आहे. नाशिकसह जळगाव, धुळे, मालेगाव या उत्तर महाराष्ट्रासह मुंबई, ठाणे, पालघरमध्ये उष्ण आणि दमट वातावरणाचा 'यलो ॲलर्ट' देण्यात आला आहे. राज्यातील अनेक भागात पाण्याची टंचाई भासत आहे. यामुळे अद्यापही शेतमालाची आवक देखील बाधित झाली आहे. नियमित होत असेल्या आवकेच्या तुलनेत अवघी ५० ते ६० टक्के आवक सध्या सुरू असल्याने भाजीपाल्याचे दर कडाडलेलेच आहेत. पालेभाज्या तर मिळेनाशा झाल्या आहेत. ज्या थोड्याफार पालेभाज्या उपलब्ध होत आहेत. त्यांचे दरही जास्त असल्याचे चित्र आहे.

**मेथी आणि कांदापात ५० रुपये जुडी** - शेतकरी बांधवांकडील भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दाखल होत असतो. तेथून विक्रेत्यांकडून भाजीपाला खरेदी करत किरकोळ बाजारात विक्री केली जाते. नियमित आवकेच्या सुमारे ५० ते ६० टक्केच आवक सध्या होत आहे. त्यामुळे कोणत्याही भाजीचे दर २५ किंवा ३० रुपये पावशेरपासून सुरु होऊन १२० ते १५० रुपये किलोपर्यंत जात आहेत. कोथिंबीरसह सर्व पालेभाज्या महागल्या आहेत. मेथी आणि कांदापात ५० रुपये जुडी एवढा भाव मिळत आहे.

# डोंबिवलीतील कंपन्या अंबरनाथमध्ये हलवणार

डोबिवली - डोंबिवली एमआयडीसी परिसरात असलेल्या अमुदान कंपनीत केमिकल रिॲक्टरचा स्फोट होऊन आग लागली. यामध्ये अंबर केमिकल, ओमीगा केमिकल आणि के जी केमिकल कंपनी जळून खाक झाली आहे. या घटनेमध्ये आतापर्यंत ४८ जण जखमी तर ७ जणांचा दुर्देवी मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांसदर्भातील माहिती दिली. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. डोंबिवलीत निवासी भागात MIDC आहे. त्यात धोकादायक केमिकल निर्मितीचे कारखाने आहेत. त्यांच्या स्थलांतराचा याबाबत निर्णय घेणं आवश्यक असल्याचं, शिंदे पक्षाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी सांगितलं. डोंबिवली एमआयडीसी परिसरात

## 'कंपन्या अगोदर आल्या मग वसाहती आल्या', रासायनिक कंपन्यांसंदर्भात मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय



कंपनी अगोदर आल्या मग वसाहत झाली, असे मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान ब्लास्ट असणाऱ्या रासायनिक कंपन्यांना अंबरनाथमध्ये हलवण्यात येतील अशा निर्णय आम्ही घेतोय, असे मुख्यमंत्री म्हणाले. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गिरीश महाजन, तानाजी सावंत, गुलाबराव पाटील या चौघांची मिटींग झाली. यानंतर ते बोलत होते.

डोंबिवली सोनार पाडा परिसरातील एमआयडीसी फेस नंबर दोन मधील अंबर कंपनीतील बॉयलरचा मोठा स्फोट झाला, या स्फोटाची तीव्रता एवढी मोठी होती की त्याचा हादरा तीन ते चार किलोमीटर जाणवला, या कंपनीपासून २०० ते ३०० मीटर अंतरावर असलेल्या रहिवासी क्षेत्रातील इमारतींच्या काचा फुटल्या तसेच व्यावसायिक इमारतींचही मोठं नुकसान झालं आहे.

## काय म्हणाले श्रीकांत शिंदे?

या घटनेवर श्रीकांत शिंदे यांनीदेखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो आहोत. जखमींना आम्ही विविध रुग्णालयात दाखल केलं आहे. साधारण ३० ते ३५ जण या घटनेत जखमी झाली आहे. अतिधोकादायक रसायनं तयार करणाऱ्या कंपन्या शहराच्या बाहेर नेल्या जाव्यात अशी मागणी स्थानिकांकडून केली जात असल्याची माहिती श्रीकांत शिंदे यांनी दिली.

आम्ही यासंदर्भात पुढच्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याशी आम्ही चर्चा करुन याविषयीचा निर्णय घेऊ, असे त्यांनी सांगितले. येत्या ६ महिन्यांत इथल्या अतिधोकादायक केमिकल तयार करणाऱ्या कंपन्या शहराबाहेर कशा नेता येतील? यावर आम्ही लक्ष केंद्रीत करणार असल्याची प्रतिक्रिया श्रीकांत शिंदेंनी दिली.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेला या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशील श्री उदयराज शिवलाल शर्मा यानी श्री सलीम मोहम्मद अली अमलानी यांच्या कडून एक औद्योगिक गाळा रजिस्टर नोंदणीकृत खरेदी खताने दिनांक 31 जुलै 2020 रोजी विकत घेतला व हा करारनामा दिनांक 27 जानेवारी 2021 रोजी रजिस्टर केला त्याचा रजिस्ट्रेशन नंबर बवड-1 - 15 45 / 2021 असा आहे. सदर गाळा श्री अमलानी यांनी श्रीराम सी गोयल यांचेकडून रजिस्टर नोंदणीकृत खरेदी खताने दिनांक 7 एप्रिल 2015 रोजी विकत घेतला व त्याच दिवशी रजिस्टर केला त्याचा रजिस्ट्रेशन नंबर बवड-1 - 2407 / 2015 असा आहे. तर श्री श्रीराम श्री गोयल यांनी सदर गाळा मेसर्स ओसवाल इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स या भागीदारी संस्थेकडून मालकी तत्त्वावर दिनांक 25 फेब्रुवारी 2010 त्या दिवशी विकत घेतला त्यासंबंधीचे करार पत्र त्यांनी नोंदणी केलाअसून त्याचा नोंदणी क्रमांक बवड- 2 -1318/2020 असा आहे त्याचा तपशील पुढील प्रमाणे - गाळा क्रमांक 13, ओसवाल इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स बिल्डिंग नंबर एफ ग्रामपंचायत घर नंबर 1313/F,-13 गाव मौजे सोनाळे तलाठी सजा टेमघर तालुका भिवंडी जिल्हा ठाणे (यापुढे सदर गाळा असा उल्लेख आल्यास व वेगळा उल्लेख नसल्यास वर वर्णन केलेलला गाळा समजावा)

सदर गाळाधारकांची गृहनिर्माण संस्था अथवा तत्सम कोणती संस्था नोंद झालेली नाही सदर गाळा हा आमच्या आशिलांच्या नावे ग्रामपंचायत सोनाळे यांचे दप्तरी नोंद झाला असून त्यावर कर आकारणी देखील ग्रामपंचायत ने केली आहे. सदर गाळा आमच्या अशीलाना टी जे एस बी बँक मुलुंड पूर्व मुंबई यांच्याकडे गहाण टाकून बँकेकडून कर्ज घ्यावयाचे आहे. बँकेच्या वकिलाने यासाठी नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेचे अथवा बिल्डरचे ना हरकत प्रमाणपत्र मागितले आहे यापैकी दोन-तीन व्यवहार झाले असल्यामुळे बिल्डरचा पत्ता आमच्या आशीलाना माहीत नाही. तसेच आजपर्यंत गाळेधारकांचे कोणतेही नोंदणीकृत गृहनिर्माण निर्माण संस्था, अपार्टमेंट, आधी तत्सम कोणतीही संस्था स्थापन झालेली नाही. त्यामुळे बँकेची सदर मागणी आमच्या अशिलांना पूर्ण करता येणे शक्य नाही म्हणून बँक व त्यांच्या वकिलाच्या सल्ल्याप्रमाणे आमच्या अशीलानी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करून सदर गाळ्यावर कर्ज देण्यास कुणाची हरकत आहे किंवा काय हे तमाम जनतेकडून मागवण्याचे ठरवले व त्याप्रमाणे ही जाहिरात प्रसिद्ध केली. तरी सदर गाळा आमच्या अशिलांच्या नावे ग्रामपंचायत दप्तरी हस्तांतरित झाला आहे, शासकीय दप्तरी देखील त्यांच्या नावाची नोंद झाली आहे , या अनुषंगाने आणि सदर गाळा बँकेकडे गहाण टाकण्याच्या अनुषंगाने कोणाची काही हरकत असल्यास तसेच सदर गाळ्यावर कसले हक्क उदाहरणार्थ तारण, गहाण, दान, पोटगी, बोजा इत्यादी असतील तर त्यासंबंधी काही लेखी म्हणणे सादर करायचे असेल तर ते कागदोपत्री पुराव्यासह पुढील पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत सादर करावे. विहित मुदतीनंतर सादर झालेल्या हरकती दाव्यांची दखल घेतली जाणार नाही. तसेच सदर हक्क संबंधितानी स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल व सदर गाळा आमचे अशिलाकडून गहाण टाकण्यात येईल याची नोंद घ्यावी यासंबंधी हरकती व आपले लेखी म्हणणे मांडण्यासाठीचा पत्ता पुढे दिला आहे.

सही
श्रीनिवास भा. घैसास.
वकील उच्च न्यायालय व नोटरी भारत सरकार
घैसास अँड असोसिएट्स करता

संपर्कासाठी पत्ता :-
द्वारा घैसास अँड असोसिएट्स , 2 ए, तळमजला,
चंदन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी.
कीर्तिकर कंपाऊंड , नूरीबाबा दर्गारोड ,मखमली तलावाजवळ,
ठाणे (पश्चिम) 400 601.
दूरध्वनी :- 022 -25401813,254163 36, 25400659.
भ्रमणध्वनी:- 9869080714, 7039130641



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01739/18/24
Inquiry/case No. : ACC/III/472/2024
Name of the Trust : ANUBHAV EDUCATIONAL AND CHARITABLE TRUST
**Address of the Trust :** C/O MANOHAR HARIRAM MANCHANDYA, SHOP 1001, 1ST FLOOR, NEAR PUNJAB NATIONAL BANK, ULHASNAGAR THANE, ULHASNAGAR, ULHASNAGAR
**Name of the Applicant :** VIKAS GABAJI DABHADE

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 11000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. Eleven Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 22/05/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- पदाचे नाव : विद्युत सहाय्यक

शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## इंडियन आर्मी डेंटल कॉर्प्स भरती

- पदाचे नाव: शार्ट सर्विस कमिशन ऑफिसर
- शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह BDS/MDS (ii) एक वर्षाची रोटेटरी इंटर्नशिप पूर्ण (iii) NEET (MDS)-२०२४
- वयाची अट: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ४५ वर्षांपर्यंत.
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

## भारतीय हवाई दलात अग्निवीरवायु (संगीतकार) पदाची भरती

- कोर्सचे नाव: अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२५

जागा : पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही.

पदाचे नाव: अग्निवीरवायु (संगीतकार)

- शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संगीत अनुभव प्रमाणपत्र/डिप्लोमा
- शारीरिक पात्रता: उंची/छाती पुरुष महिला , उंची १६२ सेमी १५२ से.मी.

छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून. -

वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००४ ते ०२ जुलै २००७ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२
- मेळाव्याचा कालावधी: ०३ ते १२ जुलै २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://indianairforce.nic.in/

## यूपीएससीमार्फत संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा २०२४

- परीक्षेचे नाव: संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (CDS-II) २०२४
- पदाचे नाव/कोर्सचे नाव

१ भारतीय भूदल (मिलिटरी) अकॅडेमी, डेहराडून १५९

२ भारतीय नेव्हल अकॅडेमी, एझीमाला, Executive (General Service)/Hydro

३ हवाई दल अकॅडेमी, हैदराबाद,No. 218 F(P) Course

४ ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी (पुरुष) चेन्नई, 122nd SSC (Men) Course (NT)

५ ऑफिसर्स ट्रेनिंग कॅडमी (महिला) चेन्नई,-36th SSC Women (Non-Technical) Course

- जागा : ४५९
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: पदवीधर.

पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी.

पद क्र.३: पदवी (Physics and Mathematics at 10+2 level) किंवा इंजिनिअरिंग पदवी.

पद क्र.४: पदवीधर.

पद क्र.५: पदवीधर.

- वयाची अट:

पद क्र.१: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

पद क्र.२: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

पद क्र.३: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००५ दरम्यान.

पद क्र.४: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

पद क्र.५: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ जून २०२४
- लेखी परीक्षा: ०१ सप्टेंबर २०२४
- अधिकृत वेबसाईट:

## भारतीय सैन्य १०+२ टेक्निकल एंट्री स्कीम कोर्स

- कोर्सचे नाव: १०+२ टेक्निकल एंट्री स्कीम कोर्स ५२-जानेवारी २०२५
- शैक्षणिक पात्रता: ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण २०२४ मध्ये उपस्थित.
- वयाची अट: जन्म ०२ जुलै २००४ ते ०१ जुलै २००७ च्या दरम्यान.
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
- फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १३ जून २०२४ (१२:०० )
- अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/ GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET

पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव

वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## सीमा सुरक्षा दल

- combatised/group_B/2024 1 इंस्पेक्टर (Librarian)
- combatised/group_B_C/2024 2 सब इंस्पेक्टर (Staff Nurse)
- असिस्टंट सब इंस्पेक्टर (Lab Tech)
- असिस्टंट सब इंस्पेक्टर (Physiotherapist)
- SMT_WKSP/२०२४ सब इंस्पेक्टर (Vehicle Mechanic)
- कॉन्स्टेबल (OTRP)
- कॉन्स्टेबल (SKT)
- कॉन्स्टेबल (Fitter)
- कॉन्स्टेबल (Carpenter)
- कॉन्स्टेबल (Auto Elect)
- कॉन्स्टेबल (Veh Mech)
- कॉन्स्टेबल (BSTS)
- कॉन्स्टेबल (Upholster)

Veterinary_Staff/2024 हेड कॉन्स्टेबल (Veterinary)

- हेड कॉन्स्टेबल (Kennelman)
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: ग्रंथालय विज्ञान किंवा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयात पदवी.

पद क्र.२: (१) १२वी उत्तीर्ण (२) जनरल नर्सिंग डिप्लोमा/पदवी

पद क्र.३: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) डीएमएलटी

पद क्र.४: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) फिजियोथेरपिस्ट डिप्लोमा/पदवी (३) ०६ महिने अनुभव

पद क्र.५: ऑटोमोबाईल/ मेकॅनिकल डिप्लोमा/पदवी

पद क्र.६ ते १३: (१) १०वी उत्तीर्ण (२) संबंधित ट्रेड मध्ये

पद क्र.१४: (१) १२वी उत्तीर्ण (२) व्हेटर्नरी स्टॉक असिस्टंट कोर्स (३) ०१ वर्ष अनुभव

पद क्र.१५: (१) १०वी उत्तीर्ण (२) शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा पशुवैद्यकीय महाविद्यालय किंवा शासकीय पशु फार्म येथून जनावरे हाताळण्याचा दोन वर्षांचा अनुभव.

- वयाची अट: १७ जून २०२४ रोजी, /: ०५ वर्षे सूट, : ०३ वर्षे सूट

पद क्र.१ ५: ३० वर्षांपर्यंत

पद क्र.२: २१ ते ३० वर्षे

पद क्र.३: १८ ते २५ वर्षे

पद क्र.४: २० ते २७ वर्षे

पद क्र.६ ते १५: १८ ते २५ वर्षे

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी /: फी नाही

पद क्र.1,2, 5, 14 & 15: General/OBC/EWS: ₹200/-

पद क्र..3,4, 6 ते13: General/OBC/EWS: ₹100/-

- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ जून २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/

# आरसीबीच्या पदरी पुन्हा निराशा

## राजस्थानची दुसऱ्या क्वालिफायरमध्ये धडक





अहमदाबाद : यशस्वी जैस्वाल (४५), रियान पराग (३६) व शिमरॉन हेटमायरच्या (२६) उपयुक्त खेळीच्या बळावर राजस्थान रॉयल्सने 'आयपीएल'मधील एलिमिनेटर लढतीत 'आरसीबी'च्या स्वप्नवत पुनरागमनाच्या आशाअपेक्षांचा अक्षरश: धुव्वा उडवला आणि क्वालिफायर-२ मध्ये जोरदार धडक मारली. अगदी स्लॉग ओव्हर्समध्ये दोन्ही संघांत येथे रस्सीखेच रंगली खरी. मात्र, अंतिम क्षणी राजस्थानने या लढतीला एकतर्फी स्वरूप दिले. 'आरसीबी'ने २० षटकांत ८ बाद १७२ धावा केल्यानंतर राजस्थानने १९ षटकांत ६ बाद १७४ धावांसह एककलमी वर्चस्व गाजवले. एकीकडे राजस्थानने येथे सलग ४ पराभवांची श्रृंखला खंडित केली, तर दुसरीकडे 'आरसीबी'ला यंदा आणखी एकदा 'आयपीएल' जेतेपदाने हुलकावणी दिल्याचे सुस्पष्ट झाले!

प्रारंभी, राजस्थानला विजयासाठी १७३ धावांचे आव्हान असताना यशस्वी जैस्वालने एकाकी किल्ला लढवण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्यांचे अन्य फलंदाज ठरावीक अंतराने बाद होत राहिले होते. टॉम कोहलर-लॅडमोर (२०), संजू सॅमसन (१७), ध्रुव ज्युरेल (८) स्वस्तात बाद झाल्याने हा राजस्थानसाठी मोठा धक्का होता. १८ व्या षटकात रियान पराग ३६ धावांवर बाद झाला. हेटमायर मोक्याच्या क्षणी बाद झाल्याने राजस्थानला आणखी एक धक्का बसला होता. मात्र, रोव्हमन पॉवेलने अंतिम क्षणी सर्वस्व पणाला लावत असताना त्याला नशिबाचीही साथ लाभली आणि याचमुळे राजस्थानला यश खेचून आणता आले. पॉवेलने १९ व्या षटकातील शेवटच्या चेंडूवर उत्तुंग षटकार खेचला आणि इथेच राजस्थानच्या दणकेबाज विजयावर अगदी थाटात शिक्कामोर्तब झाले!

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना प्लेसिस बाद झाल्याने आरसीबीला चौथ्याच षटकात पहिला धक्का सोसावा लागला होता. प्लेसिसचा बोल्टच्या गोलंदाजीवर उत्तुंग फटका मारण्याचा प्रयत्न फसल्यानंतर रोव्हमन पॉवेलने डीप मिडविकेटवरून धावत डाईव्हवर अप्रतिम झेल टिपला आणि राजस्थानला येथे पहिला ब्रेकथ्रू मिळाला.

अश्विनच्या कॅरम बॉलवर कॅमेरून ग्रीनने कव्हरवर तैनात पॉवेलकडे सोपा झेल दिला. १३ व्या षटकात ग्लेन मॅक्सवेल ऐन मोक्याच्या क्षणी बाद झाल्याने 'आरसीबी'साठी हा आणखी एक धक्का ठरला. मॅक्सवेलचा मोठा फटका मारण्याचा प्रयत्न चुकला आणि यामुळे 'आरसीबी'च्या पदरी येथेही निराशा आली. अश्विनचा ऑफब्रेक चेंडू क्रॉस द लाईन खेळण्याच्या नादात मॅक्सवेल चकला. ज्युरेलने लाँगऑनवर झेल टिपत मॅक्सवेलची खेळी संपुष्टात आणली.

रजत पाटीदारने २२ चेंडूंत ३४ धावा केल्या असल्या, तरी धावांचा वेग वाढवण्याच्या प्रयत्नात अवेशच्या गोलंदाजीवर त्याने रियान परागकडे झेल दिला. पायचीत बादवर 'डीआरएस' घेतल्याने एकदा बचावलेल्या दिनेश कार्तिकला १३ चेंडूंत ११ धावांवर परतावे लागले. जैस्वालने कव्हरवरून मागे धावत येत कार्तिकचा झेल टिपला. १७ चेंडूंत ३२ धावा जमवणार्या लोमरोरने अवेशच्या गोलंदाजीवर डीप कव्हरवरील पॉवेलकडे सोपा झेल दिला. डावातील शेवटच्या चेंडूवर कर्ण शर्मा बाद झाला आणि यानंतर राजस्थानसमोर १७३ धावांचे आव्हान असेल, हे स्पष्ट झाले.

### प्ले-ऑफ लढतीत चार झेल घेणारा रोव्हमन पहिला खेळाडू

राजस्थान रॉयल्सच्या रोव्हमन पॉवेलने या लढतीत चार फलंदाजांचे झेल घेतले. फाफ ड्युप्लेसिस, कॅमेरून ग्रीन, महिपाल लोमरोर व कर्ण शर्मा यांचा त्यात समावेश राहिला. प्ले-ऑफ लढतीत एखाद्या खेळाडूने चार झेल टिपण्याची ही 'आयपीएल' इतिहासातील पहिलीच वेळ ठरली.

### अन् चहलच्या अलगद जाळ्यात सापडला विराट कोहली!

'आरसीबी'च्या आठव्या षटकात स्लॉग स्वीपच्या प्रयत्नात विराट कोहलीने आपली विकेट गमावली. चहलच्या लेगब्रेक चेंडूवर विराटने स्पिनविरुद्ध फटका मारण्याचा प्रयत्न केला आणि डीप मिडविकेटवरील फेरेराकडे थेट झेल गेला. त्यापूर्वी विराटने ८ हजार धावांचा टप्पा पार केला होता.







# तुम्ही रोज मासे खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल?

आपल्या देशात मासे आवडीने खाणारे अनेक लोक आहेत. विशेषत: कोकणपट्ट्याकडे राहणारे लोक समुद्रातील मासे अगदी आवर्जून खातात. अनेक प्रकारचे मासे बाजारात उपलब्ध असतात आणि त्या प्रत्येक माशाची चव वेगळी असते. तसंच त्यातून मिळणारे पोषक घटकही वेगळे असतात. माशांमध्ये अनेक पोषक तत्वे असतात. जी आपल्या शरीराला गरजेची आहेत. मासे खाण्याचे अनेक फायदे आहेत, हे तुम्हाला माहिती असतीलच. पण तुम्ही दररोज मासे खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल, हे तुम्हाला माहिती आहे का? याबाबतचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ

माशांमध्ये लो फॅटचे प्रोटीनचे प्रमाण सर्वाधिक असते जे शरीरासाठी आवश्यक असते. माशांमध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड आणि व्हिटॅमिन्स D आणि B2 असते. या शिवाय माशांमध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस आणि झिंक, आर्यन, आयोडीन, मॅग्नेशिअम आणि पोटॅशिअम यांचे योग्य प्रमाण असते. तुम्ही मासे खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल, जाणून घ्या

**१ मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

चरबीयुक्त माशांमध्ये असलेले ओमेगा -३ फॅटी सिड आपल्या मेंदूमध्ये असणाऱ्या न्यूरॉन्सचा विकास स्थिर ठेवण्यास मदत करते. यामुळे मेंदूची कार्यक्षमता आणि सामर्थ्य वाढू शकते. माशांच्या नियमित सेवनाने मानसिक आरोग्य सुधारण्यास तसेच अनेक गंभीर आजारांचा धोका कमी करण्यास मदत होते. रोज मासे खाल्ल्याने स्मरणशक्ती वाढते.

**२. निरोगी हृदयासाठी फायदेशीर**

मासे खाल्ल्यामुळे हृदयालाही फायदा होतो. माशामध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असतं. त्यामुळे हृदय रोगाची भीती कमी होते. मासांहारी लोकांनी आहारात नियमित माशाचा समावेश करावा.

**३. मजबूत हाडे**

मासे हा व्हिटॅमिन डीचा नैसर्गिक स्रोत आहे. हाडांच्या मजबुतीसाठी कॅल्शिअम आणि व्हिटॅमिन डीची सगळ्यात जास्त आवश्यकता असते. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी माशांमध्ये भरपूर प्रमाणात असतं. त्यामुळे हाडं मजबूत करायची असतील, तर मासे नेहमी खावे.

**४. डोळ्यांसाठी फायदेशीर**

वाढत्या वयानुसार डोळ्यांची दृष्टी कमी होऊ लागते. त्यामुळे डोळे चांगले ठेवण्यासाठी मासे खायला हवे. यामुळे नजर चांगली होते. माशांमधील ओमेगा ३ फॅटी ॲसिड डोळ्यांसंबधित आजार दूर ठेवण्यास मदत करतात.

बहुतेक निरोगी व्यक्तींसाठी, आठवड्यातील बहुतेक दिवस आपल्या आहारात माशांचा समावेश करणे हे असंख्य आरोग्य फायदे मिळवण्याचा एक चांगला मार्ग असू शकतो, असे डॉ. बक्षी सांगतात.

तथापि, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या महिलांनी माशांचे सेवन करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा, असेही ते सांगतात.

# स्वातंत्र्यवीर सावरकर आत्मचरित्रपट झळकणार ओटीटीवर

हे मातृभूमी, तुजसाठी मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण - हे प्रभावशाली शब्द आपल्याला भारताच्या महान क्रांतिकारक विनायक दामोदर सावरकर यांनी ब्रिटीश काळातील स्वातंत्र्यलढ्यात बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची आठवण करून देतात. २८ मे रोजी या थोर महापुरुषाची जयंती असून यंदा नएए५ स्वातंत्र्यवीर सावरकर सिनेमाच्या वर्ल्ड डिजिटल प्रीमियरसाठी सज्ज झालं आहे. हे आत्मचरित्रपर ऐतिहासिक नाट्य म्हणजे सावरकरांच्या अतुलनीय जीवनाचे प्रामाणिक रेखाटन आहे, ब्रिटीशकालीन वसाहतवादी सत्तेच्या विरोधातील अविरत संघर्षाचं चित्रण यात केलेलं आहे. प्रतिभावान रणदीप हुड्डा दिग्दर्शित, सह-लिखित आणि सह-निर्मित या कलाकृतीत प्रमुख भूमिकेत स्वत: रणदीप हुड्डा तर सावरकरांची पत्नी यमुना बाई सावरकर म्हणून अंकिता लोखंडे असे प्रभावी कलाकार आहेत. २८ मे पासून स्वातंत्र्यवीर सावरकर खासकरून ZEE5 वर स्ट्रीम होणार आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे सर्वात निर्भीड भारतीय क्रांतिकारक विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवन प्रवासाचे वर्णन करणारे एक प्रामाणिक चरित्रात्मक नाट्य आहे. सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अत्यंत प्रभावशाली परंतु वादग्रस्त व्यक्तींपैकी एक आहेत. म्हणूनच की काय त्यांच्याविषयी फारच कमी माहिती आणि लेखन उपलब्ध असलेले पाहायला मिळते. सावरकर हे 'हिंदुत्व' आणि 'अखंड भारत' चे प्रवर्तक आहेत आणि नेताजी, भगतसिंग आणि खुदीराम बोस यांच्यासारखे महान नेते व स्वातंत्र्यसैनिकांचे ते प्रेरणास्रोत आहेत. हा सिनेमा त्यांच्या दृष्टिकोनातून सावरकरांची कथा कथन करतो, निर्भयपणे त्यांचे आदर्श आणि तत्त्वांचा स्वीकार करतो. जी तत्त्व सुरुवातीला वादग्रस्त ठरली, परंतु अखेरीस आधुनिक भारताच्या रचनेत त्यांचा मार्ग सापडला.

ZEE5 India चे चीफ बिझनेस ऑफिसर मनीष कालरा म्हणाले, ZEE5 वर 'स्वातंत्र्यवीर सावरकर' स्ट्रीम करताना आम्हाला आनंद वाटतो. आमचे प्रेक्षक या क्रांतिकारी योद्ध्याची प्रेरणादायी कथा त्यांच्या १४१ व्या जयंतीनिमित्त २८ मे रोजी पाहू शकतात. वास्तविक आणि प्रेरणादायी कथांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करणे हाच आमचा उद्देश आहे. 'सिर्फ एक बंदा काफी है', 'सॅम बहादूर', 'तरला' यासारख्या प्रेरणादायी भारतीय व्यक्तिमत्त्वांवरील विविध कथांमुळे आम्ही अलीकडच्या काळात मोठे यश पाहिले आहे आणि ZEE5 वर स्वातंत्र्यवीर सावरकर'ला चांगला प्रतिसाद मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे.

रणदीप हुड्डा याबाबत म्हणाला, मी नएए५ वर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वर्ल्ड डिजीटल प्रीमियर'ची खरोखरच वाट पाहत आहे. भारतीय सशस्त्र क्रांतीतील सर्वात प्रभावशाली क्रांतिकारकाला त्यांच्या १४१ व्या जयंतीला आदरांजली वाहण्यासाठी २८ मे या दिवसापेक्षा चांगला दिवस कोणता असू शकतो ? या प्रकल्पावर काम करण्यास सुरुवात केल्यापासून मी या प्रेरणादायी नायकाकडून बरेच काही शिकलो हे मला मान्य करावेच लागेल. या महान क्रांतिकारकाचा वारसा गाडून टाकण्यासाठी, त्यांच्याविषयी पसरवलेल्या खोट्या कथनाचा प्रतिकार करण्यासाठी मला हा सिनेमा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवायचा आहे. असा समृद्ध आणि प्रेरणादायी वारसा आपल्याकडे सुपूर्द केलेल्या या प्रभावशाली परंतु दुर्भागी क्रांतिकारकाचे जीवन पडद्यावर जगायला मिळणे हा माझ्यादृष्टीने एक सन्मानच होता. भारतीय इतिहासातील लपलेले अध्याय जाणून घेण्यासाठी आणि तो योग्य वीर आहे की नाही हे स्वतः ठरवण्यासाठी मी प्रत्येक भारतीयाला हा चित्रपट पाहण्याची विनंती करेन.

वाढीव टँकरचे प्रस्ताव कागदोपत्रीच

## शहापूरवासियांचा जल आक्रोश सुरूच

ठाणे: शहापूर तालुक्यातील ज्या गाव - पाड्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई आहे त्या ठिकाणी नियोजन करून वाढीव टँकर पुरविण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने एप्रिल महिन्यात करण्यात आले होते. मात्र हे नियोजन केवळ कागदोपत्रीच राहिले असून मे महिन्याचा अखेर उजाडला असूनही शहापूर तालुक्यातील गावांना अधिकचा पाणी पुरवठा उपलब्ध होऊ शकलेला नाही. तर दुसरीकडे जलजीवन मिशनच्या माध्यमातून संपूर्ण शहापूर तालुक्यात गेल्या वर्षभरापासून केवळ जलवाहिन्या टाकून प्रत्येक घरात नळ जोडणी देण्यात आली आहे. मात्र याद्वारे पाणी पुरवठाच सुरू केला नसल्याने ग्रामस्थांकडून तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे.

जिल्ह्यातील मुरबाड आणि शहापूर तालुक्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईची समस्या जाणवत असते. जिल्हा परिषद तसेच जिल्हा प्रशासनाच्या वतीने दरवर्षी या ठिकाणी पाणीपुरवठा करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात येतात. विंधन विहिरींची उभारणी, 'जल मिशन' द्वारे पाण्याचा पुरवठा, 'हर घर जल मिशन' यांसारख्या विविध योजनांची अंमलबाजवणी या दोन्ही तालुक्यांतील गावांत करण्यात येत आहे. मात्र या योजना केवळ कागदोपत्रीच असल्याने दरवर्षी प्रमाणे यंदाही शहापूर वासियांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. यावर्षी फेब्रुवारी महिन्याच्या अखेर पासूनच शहापूर तसेच मुरबाड तालुक्यात पाणीटंचाई जाणवू लागली होती. पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून शहापूर तालुक्यातील काही गाव पाड्यांमध्ये टँकरने आणि पुरवठा सुरू केला होता. मात्र गेल्या महिन्यात ज्याप्रमाणे उन्हाचा तडाखा वाढू लागला त्याचप्रमाणे शहापूर मध्ये पाणीटंचाईची समस्या देखील अधिक तीव्र होऊ लागली. पाणीटंचाईची समस्या कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने एप्रिल महिन्यात शहापूर तालुक्यात वाढीव टँकर देण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र अद्यापही शहापूर तालुक्यात परिस्थिती तशीच कायम असल्याने ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. याच पाणीटंचाईला त्रस्त होऊन ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासकीय कार्यालयांवर हंडा मोर्चा देखील काढला होता. मात्र त्याचाही प्रशासनावर काही फायदा झाला नसल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले आहे.

### *जल जीवन मिशनचे नेमके झाले काय ?*

*मागील एक ते दीड वर्षाच्या कालावधीत शहापूर तसेच मुरबाड तालुक्यात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून जलजीवन मिशन राबविण्यात आले. या अंतर्गत शहापूर तालुक्यात जलवाहिनी टाकण्याचे काम करण्यात आले. तसेच प्रत्येक घरात यातून नळ जोडणी देखील देण्यात आली आहे. मात्र अद्याप या नळांद्वारे नागरिकांना पाणीपुरवठा होऊ शकलेला नाही. त्यामुळे यांना जोडण्याचे काय करायचे असा सवाल आता संत शहापूरवासीय करत आहेत. तर ३० मार्च रोजी शहापूरला या जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले होते. मात्र हा मुहूर्त नेमका हुकला कुठे याबाबत जिल्हा प्रशासन निरुत्तर आहे.*

डेब्रिज डम्पिंगला प्रतिबंध करण्यासाठी

# आता 24 तास गस्ती पथके तैनात

## कांदळवन क्षेत्र, पाणथळ जागांच्या संरक्षण आणि संवर्धनाचा आयुक्त राव यांनी घेतला आढावा

ठाणे (गणेश भोईटे)

कांदळवन आणि पाणथळ जागांचे संरक्षण आणि संवर्धन हा अतिशय संवेदनशील विषय आहे. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील कांदळवनांवर कोणत्याही स्वरुपाच्या डेब्रिजची भरणी होणार नाही, यासाठी सहाय्यक आयुक्त यांनी दक्षता घ्यावी. तसेच, ठाण्याकडे येणाऱ्या सर्व प्रवेशद्वारांवर तातडीने रात्रंदिवस गस्ती पथक तैनात करण्यात यावे. डेब्रिज घेऊन येणाऱ्या डम्परमधून ठाणे महापालिका क्षेत्राबाहेर अधिकृत डम्पिंगचा परवाना असेल तरच त्यांना पुढे जाऊ द्यावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

### नागरिकांना आवाहन

*कांदळवन क्षेत्र किंवा त्यालगत असलेल्या सीआरझेड हद्दीत नागरिकांनी कोणतेही बांधकाम करू नये. तसेच, अशा जागेतील चाळी, इमारती यात घरे घेऊ नये. कांदळवन संरक्षणाबाबतच्या उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अशी बांधकामे अनधिकृत असून ती जमीनदोस्त करण्यात येतील. त्यामुळे घर खरेदी करताना सीआरझेडच्या नियमांचा भंग झालेला नाही, याची खात्री करूनच नागरिकांनी घरे घ्यावीत. त्यासाठी महापालिकेच्या स्थानिक प्रभाग समितीत चौकशी करावी, असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांना नागरिकांना केले आहे.*

**ठाणे महापालिका क्षेत्रातील कांदळवन आणि पाणथळ जागांच्या संरक्षण आणि संवर्धनाचा आढावा घेण्यासाठी बुधवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी कांदळवन संरक्षण आणि संवर्धनासाठी ठाणे महापालिकेवर असलेली जबाबदारी आणि त्यासंदर्भात पालिकेची कार्यवाही यांची माहिती या बैठकीत दिली.**

कांदळवनाच्या बाबतीत, कळवा, दिवा, मुंब्रा, नौपाडा या प्रभाग समित्यांवर विशेष जबाबदारी आहे. सर्वप्रथम सीआरझेड हद्दीपासून ५० मीटरच्या बफर झोनचे तत्काळ सीमांकन करण्यात यावे. जेणेकरून कांदळवनाचे नेमके क्षेत्र निश्चित होऊन सहाय्यक आयुक्त यांना कार्यवाही करणे शक्य होईल, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

ठाणे महापालिका क्षेत्रातील कांदळवनांच्या क्षेत्रात कोणत्याही स्वरुपाची भरणी होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी त्याच्या सीआरझेड हद्दींचे सीमांकनाचे मोजमाप जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने तत्काळ करण्यात यावे, असे निर्देश राव यांनी महापालिकेच्या पर्यावरण विभागाला दिले आहेत. त्यांच्याकडून शास्त्रशुद्ध पद्धतीने मोजमाप होईपर्यंत शहर विकास विभागाने ढोबळमानाने मोजणी करून त्या जागांवर भराव टाकला जाऊ नये, असे फलक तत्काळ लावण्यात यावेत, असेही राव यांनी स्पष्ट केले.

आनंदनगर चेक नाका, मुलुंड चेक नाका आदी ठिकाणी तातडीने २४ तासांसाठी तीन पाळ्यांमध्ये गस्ती पथके तैनात करण्यात यावीत. या गस्ती पथकातील कर्मचारी वेळोवेळी बदलते ठेवावेत. या गस्ती पथकांच्या माध्यमातून ठाण्यात येणारे डेब्रिज रोखले जावे, असेही राव यांनी सांगितले. टप्प्याटप्पाने ठाण्याकडे येणाऱ्या सर्व प्रवेशद्वारांवर अशा पद्धतीने गस्ती पथके तैनात केली जाणार आहेत.

खारेगाव टोलनाक्या लगत कांदळवनावर सुरू असलेल्या भरावाबाबत तत्काळ उपाययोजना करण्यासाठी या कांदळवन परिसराकदे जाणाऱ्या सगळे वाटा अडवल्या जाव्यात, अशी सूचना राव यांनी केली. तिथे साठलेल्या भरावाची विल्हेवाट लावण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रित काम करावे, असेही राव म्हणाले.

दिवा येथील डम्पिंग ग्राऊंड आता बंद झाले आहे. तेथील बायो मायनिंगसाठीचा निविदा प्रक्रिया सध्या सुरू आहे. आचारसंहितेनंतर कार्यादेश दिला जाईल. या पावसाळ्यात येथील गाळमिश्रित पाणी वाहून ते खाडीत जाणार नाही यासाठी तात्पुरत्या स्वरुपाची उपाययोजना करण्याचे निर्देश राव यांनी घनकचरा विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागास दिले.

या बैठकीत, कोकण विभागीय कांदळवन व पाणथळ जागा संरक्षण आणि संवर्धन समितीचे सदस्य दयानंद स्टॅलीन यांनी कांदळवनांवर होत असलेल्या अतिक्रमणांकडे गांभीर्याने पाहण्यास सांगितले. तसेच, कोणतीही पाणथळ जागा अधिसूचित होण्याची वाट न पाहता तिचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

बुद्ध पौर्णिमा



*संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत बुद्धांच्या जन्म दिनी म्हणजेच बुध्द पौर्णिमेच्या निमित्ताने गुरुवारी घोडबंदर रोड येथील अजिंठा बुध्द विहार येथे बौद्ध भिक्खूनी तथागत बुद्धांच्या प्रतीमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. (छाया : मनोज सिंह)*

# शिक्षकांच्या गणवेशासाठी मतदान

## नवी मुंबई महापालिका शिक्षकांची प्रक्रियेला सुरुवात

नवी मुंबई : राज्य शासनाच्या १५ मार्चच्या शिक्षकांच्या गणवेशाबाबतच्या परिपत्रकानुसार नवी मुंबईतही शिक्षकांचा गणवेश निश्चित करण्यासाठी ऑनलाइन लिंक पाठवून शिक्षकांच्या मतदानाचा कौल घेतला जाणार आहे. त्याची सुरुवात नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने केली असून ४६० शिक्षकांनी लिंकद्वारे गणवेशाबाबत मतदानाचा कौल दिला आहे.

**165** पूर्वप्राथमिक शिक्षक
**859** प्राथमिक शिक्षक
**192** प्राथमिक शिक्षक

*राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने दिलेल्या मार्च महिन्यातील परिपत्रकानुसार नवी मुंबई महापालिकेतील शिक्षकांच्या गणवेशाबाबत लिंकद्वारे मतदानाचा कौल घेण्यात येत असून याबाबत शिक्षकांना लिंक पाठवण्यात आली असून त्याद्वारे अंतिम रंगनिश्चिती करण्यात येणार आहे. सर्व शिक्षकांना लिंक पाठवण्यात आली असून आतापर्यंत ४६० शिक्षकांनी लिंक पाठवली आहे.*

*– अरुणा यादव, शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महापालिका*

■ शिक्षकांचा संबंध हा भावी पिढीशी येत असून त्यांच्या गणवेशाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम करीत असताना शिक्षकांनी वेशभूषेबाबत जागरूक राहून आपली वेशभूषा ही आपल्या पदास अनुरूप असावी असे पत्रकात म्हटले असून विद्यार्थी हे अनुकरणप्रिय असल्याने शिक्षक व शिक्षिकांना गणवेशाबाबत योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांच्या गणवेशाची बाब विचारात घेता गणवेश कसा असावा त्याचा रंग कसा असावा याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

■ नवी मुंबई महापालिकेनेही आपल्या अखत्यारीत येणाऱ्या पालिकेच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचा गणवेश निश्चित केल्याप्रमाणे त्याचा रंगनिश्चितीसाठी लिंकद्वारे मतदानाचा कौल घेतला जात आहे. त्यात महिला शिक्षकांनी साडी अथवा सलवार, चुडीदार, कुर्ता व दुपट्टा तर पुरुष शिक्षकांनी जीन्स, टी शर्ट न वापरता पॅन्ट-शर्ट असा पेहराव करावा तसेच चित्र-विचित्र नक्षीदार कपडे परिधान करून नयेत, असे शिक्षण विभागाच्या आदेशात म्हटले आहे. शिक्षकांनी कोणत्या रंगाचा पेहराव करावा हे त्या शाळेने निश्चित करावे असे सांगितले आहे.

■ नवी मुंबई महानगरपालिकेतील शिक्षण विभागाने महिला शिक्षकांसाठीची साडी व कुर्ती तसेच पुरुष शिक्षकांच्या शर्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यासाठी संबंधित शिक्षकांना लिंक पाठवली आहे. त्यानुसार लिंकद्वारे साडी किंवा कुर्ती आणि शर्ट यांचा रंग निश्चित झाल्यावर त्या आधारे स्त्री शिक्षकांसाठीचा ब्लाऊज व सलवार तसेच पुरुष शिक्षकांच्या पॅन्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यात येणार आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेतील सर्व शिक्षकांच्या मोबाइलवर फॉर्मची लिंक पाठवण्यात आली असून हा फॉर्म तात्काळ भरून देण्याचे आवाहन देण्यात आले आहे.

## अटलसेतूवरील महिला कर्मचाऱ्याला दमदाटी

पनवेल : मुंबई ते उरण या मार्गावरील अटलसेतू पुलाने प्रवास करत असताना अटलसेतूवरील टोलनाका कर्मचाऱ्याला उद्धट बोलल्यास थेट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद होऊ शकतो. बुधवारी दुपारी पावणेबारा वाजता टोलनाक्यावरील एका महिला कर्मचाऱ्याला शिविगाळ व दमदाटी केल्याने एका मोटार चालकावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अटलसेतूवरुन ४९ वर्षीय हारुण पटेल हे मोटार चालवित असताना अटलसेतू येथील टोलनाक्यावर हर्षदा कोळी या पथकर जमा करण्याचे काम करत असताना ही घटना घडली. हारुण यांनी मोटार न थांबवल्याने त्यांच्या गाडीच्या पुढील बाजूवर बूमबॅरीअर पडले. यामुळे संतापलेल्या हारुण यांनी हर्षदा यांना शिविगाळ व दमदाटी केल्याची तक्रार न्हावाशेवा पोलीसांत हर्षदा यांनी केली.

## रिक्षा चालकाची आत्महत्या

पनवेल : राहत्या घरात असलेल्या किचनमधील लोखंडी पाईपाला गळफास घेवून रिक्षा चालकाने आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

जयेश यादव (३३) असे या रिक्षा चालकाचे नाव असून त्याने आपल्या राहत्या घरात असलेल्या घरातील किचनमधील लोखंडी पाईपाला कोणत्या तरी अज्ञात कारणावरुन गळफास लावून घेवून आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# डोंबिवली एमआयडीसीतील बफर झोन बेकायदा इमल्यांनी नष्ट

## निवास आणि औद्योगिक क्षेत्र सीमारेषा नसल्याने एकत्र

डोंबिवली : डोंबिवली क्षेत्रात साठ वर्षापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून औद्योगिक क्षेत्र विकसित केले. त्यावेळी औद्योगिक क्षेत्र आणि निवास क्षेत्र यांच्यामध्ये एक संरक्षित पट्टा म्हणून चार ते पाच किलोमीटरचा बफर झोन (झालर पट्टी) नियोजनकारांनी येथील एमआयडीसीत प्रस्तावित केला होता. परंतु, तत्कालीन राजकारणी मंडळींनी दबावतंत्राचा वापर करून या झालर पट्टीवर आपले वर्चस्व दाखवून तेथे निवासी संकुले उभारण्यासाठी पुढाकार घेतला.

एमआयडीसीत झालरपट्टीत यापूर्वी उभारण्यात आलेली निवास संकुले ही कंपन्यांना एकदम खेटून आहेत. तत्कालीन राजकारणी मंडळींनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून केलेल्या या कृतीचा आता सामान्यांना सर्वाधिक त्रास होत आहे. त्यावेळी झालर पट्टीत स्वस्तात घर घेतलेली मंडळी आता आहे ती जागा सोडण्यास तयार नाहीत. या जागांचे भाव आता दामदुप्पट झाले आहेत. आमची घरे गगनचुंबी होतील या विचारात असलेली ही मंडळी घरात कंपन्यांचा धूर येतोय तरी घरे सोडण्यास तयार नाहीत, असे चित्र डोंबिवली एमआयडीसीत आहे.

एमआयडीसी क्षेत्राची नियोजनकार ही एमआयडीसी आहे. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी अधिकारवाणीने कधीही या भागावर स्वताचे नियंत्रण ठेवले नाही. त्यामुळे एमआयडीसीचे औद्योगिक विभागासाठी राखीव असलेले ५०० हून अधिक भूखंड आजदे, सागर्ली आणि डोंबिवली शहरातील काही भूमाफियांनी टोलेजंग बेकायदा इमले बांधून हडप केले आहेत.

## भरधाव रिक्षाची वॉल कंपाऊंडला धडक

पनवेल : पनवेल तालुक्यातील हरिग्राम ते केवाळे या मार्गावरुन भरधाव वेगाने घेवून जाणार्या रिक्षा चालकाने एका वॉल कंपाऊंडला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षातील तीन महिला प्रवाशींपैकी एकीचा मृत्यू झाला आहे तर दोघी जणी जखमी झाल्या आहेत.

सदर रिक्षा चालक हा पनवेल येथून प्रवासी भरून हरिग्राम ते केवाळे मार्गे चालला असताना त्याचा रिक्षावरील ताबा सुटून त्याने वॉल कंपाऊंडला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षा प्रवासी नागूबाई भगत (५९) हा गंभीररित्या जखमी मृत्यू झाल्या आहेत. तर इतर दोन प्रवासी जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र वेळेत नुतनीकरण न केल्यास

# 'आरटीओ'कडून ५० रूपये विलंब आकार


कल्याण : वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र विहित वेळेत नुतनीकरण न केल्यास ५० रूपये विलंब शुल्क आकारणीला स्थगिती देण्याची मुंबई बस मालक संघटनेची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने निकाली काढल्याने राज्याच्या परिवहन विभागाने उपप्रादेशिक परिवहन विभागांना वाहन मालकांकडून विलंब शुल्क आकारणी करण्याचे आदेश दिले आहेत.

रिक्षा संघटनेचा विलंब शुल्क आकारणीस विरोध नाही. फक्त याविषयी परिवहन विभागाने पहिले जागृती करावी. योग्यता प्रमाणपत्र मुदत संपलेल्या रिक्षेसह इतर वाहन चालकांना काही मुदत द्यावी. या गोष्टीचा प्राधान्याने विचार परिवहन विभागाने करावा.

**–अंकुश म्हात्रे, पदाधिकारी,** रिक्षा चालक मालक संघटना.

हा निर्णय यापूर्वीपासूनचा आहे. फक्त यासंदर्भातची एक याचिका उच्च न्यायालयात सुरू होती. ती याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे आकार सुरू केला आहे. रिक्षा संघटनेची मते जाणून घेऊ.

**–रमेश कल्लुरकर,** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.



रिक्षा संघटना, बस मालक संघटना किंवा इतर वाहन संघटनांना कोणतीही पूर्वसूचना न देता हा विलंब शुल्क आकार उपप्रादेशिक परिवहन विभागांनी सुरू केल्याने तो अन्यायकारक आहे, असा इशारा देत हा विलंब आकार रिक्षा, वाहन मालक संघटनांना विहित मुदत देत, याविषयी जागृती करत मग आकारावा, अशी मागणी रिक्षा चालक मालक युनियन डोंबिवली शाखेने कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रमेश कल्लुरकर यांच्याकडे केली आहे.

या मागणीचा विचार केला नाही तर रिक्षा चालक आंदोलन करतील, असा इशारा रिक्षा संघटनेचे अंकुश म्हात्रे, शेखर जोशी, भिकाजी झाडे, विश्वंभर दुबे, सुरेंद्र मसाळकर, विष्णू डोईफोडे यांनी दिला आहे.


वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र विहित वेळेत वाहन मालकाने उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून नुतनीकरण केले नाही तर केंद्र शासनाने केंद्रीय मोटार वाहन कायद्याने संबंधित वाहन चालकांकडून ज्या दिवशी योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाची मुदत संपली आहे, त्या दिवसापासून प्रति दिन ५० रूपये विलंब शुल्क आकारावे, असा नऊ वर्षापूर्वी आदेश काढला होता. हा आदेश वाहन मालकांवर अन्यायकारक असल्याने मुंबई बस वाहन संघटनेने या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देऊन या आदेशाला स्थगितीची मागणी केली होती. मागील आठ वर्षापासून ही याचिका उच्च न्यायालयात सुरू होती. गेल्या महिन्यात मुंबई बस मालक संघटनेची याचिका उच्च न्यायालयाने निकाली काढली. परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी केंद्रीय मोटार वाहन कायद्याप्रमाणे योग्यता प्रमाणपत्र विहित मुदतीत नुतनीकरण न करणाऱ्या वाहन चालकांकडून विलंबाची तारीख पाहून प्रति दिन ५० रूपये विलंब शुल्क आकारणी करण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशाची अंमलबजावणी सुरू झाल्याने यात रिक्षा चालक भरडले जाणार आहेत, अशी शक्यता व्यक्त करत रिक्षा संघटनेने अशाप्रकारे विलंब आकार यापुढेपासून आकारण्यापूर्वी रिक्षा चालकांसह इतर वाहन मालकांमध्ये याविषयी जनजागृती करावी. रिक्षा संघटनेकडे या विषयी चर्चा करावी, मग या निर्णयाची अंमलबजाणी करावी, अशी मागणी रिक्षा संघटनेने केली आहे.

प्रशासन एमसीझेडएमए परवानगीच्या प्रतीक्षेत

# धारण तलाव स्वच्छतेचा अडसर कायम

नवी मुंबई : नवी मुंबई शहरातील धारण तलावांची स्वच्छता गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात आलेली नाही. धारण तलावात आलेल्या कांदळवनामुळे गाळ काढण्यात अडचणी येत आहेत. पावसाळ्यात सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली होती. मात्र आता त्यात गाळ साचलेल्याने पावसाळ्यात पाणी साचते. कांदळवनातील गाळ काढण्यासाठी महापालिकेला एमसीझेडएमएची परवानगी अद्याप मिळाली नाही. त्यामुळे धारण तलावांमधून पाण्याचा योग्य निचरा व्हावा म्हणून पालिकेतर्फे सीबीडी येथील पंप हाऊससमोरील गाळ काढण्यास सुरुवात केली आहे.



गेल्या १९ वर्षांपासून स्वच्छता करण्यात आलेली नाही

नवी मुंबईत शहर हे खाडीकिनारी वसले आहे. त्यामुळे खाडीत येणाऱ्या भरतीचे पाणी शहरात येऊ नये व शहरातील सांडपाण्याचा निचरा खाडीत व्हावा या हेतूने सिडकोने नवी मुंबईतील विविध भागांत धारण तलाव तयार केले आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ११ धारण तलाव आणि स्टॉर्म वॉटर पंप हाऊसला लागून असलेले दोन धारण तलाव असे एकूण १३ धारण तलाव आहेत. या तलावांची गेल्या १९ वर्षांपासून स्वच्छता करण्यात आलेली नाही. आजघडीला या धारण तलावांची दुरवस्था झाली आहे. शहरातील सिडकोकालीन सर्वच धारण तलाव मागील अनेक वर्षे साफ न केल्याने ते गाळाने व खारफुटीने भरले असल्याने धारण तलावांची स्वच्छता रखडली आहे.

धारण तलावात असलेल्या खारफुटी कांदळवनामुळे त्यातील गाळ काढण्यास अडचणी येत आहेत. न्यायालय आणि एमसीझेडएमएची परवानगी प्रलंबित आहे. त्यामुळे संपूर्ण धारण तलावाची स्वच्छता करण्यात अडचण येत आहे. पावसाळ्यात पाणी साचू नये म्हणून कांदळवनाला धक्का न लावता पंप हाऊससमोरील गाळ काढण्यात येत आहे.

**-अरविंद शिंदे,** कार्यकारी अभियंता, नवी मुंबई महापालिका

सीबीडीत असलेल्या धारण तलावातील गाळामुळे पावसाळ्यात परिसरात पाणी साचते. या तलावातील गाळ काढण्यासाठी सातत्याने आमचा पाठपुरावा सुरू आहे. यंदा पाणी साचू नये म्हणून पंप हाऊससमोरील गाळ काढण्याचे काम आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा लवकर होईल.

**-डॉ. जयाजी नाथ,** माजी नगरसेवक

## 'मशाल चिन्हा'चे बूथ लावल्याने दोघांना मारहाण

ठाणे : लोकसभा निवडणूकीत कळवा येथील मतदान केंद्राबाहेर 'मशाल चिन्हा'चे बूथ लावल्याने पिता-पुत्रांना घरात शिरून बेदम मारहाण करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण लोकसभेसाठी शिवसेनेकडून श्रीकांत शिंदे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून वैशाली दरेकर- राणे या निवडणूक लढवित आहेत. २० मे या दिवशी मतदान असल्याने कळवा येथील जयभीमनगरमधील शंकर मंदिराजवळ ठाकरे यांच्या पक्षाचे मशाल चिन्हाचे बूथ लावण्यात आले होते. या बूथवर परिसरात राहणारे दिनेशकुमार तिवारी, त्यांचा मुलगा अमन यांच्यासह काहीजण बसले होते. सकाळी ९ वाजताच्या सुमारास परिसरातील माजी नगरसेवक गणेश कांबळे हे त्याठिकाणी आले. त्यांनी बूथवर बसलेल्या सर्वांना हकलून दिले. मतदान संपल्यानंतर अमन, दिनेशकुमार हे कुटुंबासह रात्री ११.३० वाजताच्या सुमारास घरात होते. त्यावेळी सात ते आठ जण त्यांच्या घरात शिरले. त्यानंतर त्यांनी दिनेशकुमार यांना शिवीगाळ आणि मारहाण करण्यास सुरूवात केली. अमन तिवारी हा त्यांना प्रतिकार करू लागला असता, त्याला देखील मारहाण करण्यात आली. परिसरात आरडाओरड झाल्यानंतर मारहाण करणारे पळून गेले. त्यानंतर अमन याने पोलिसांना संपर्क साधला. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मंगळवारी अमन याने याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेल बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाची यशस्वी वर्षपूर्ती

पनवेल : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने २४ मे २०२३ रोजी पदभार स्विकारला होता.येत्या २४ तारखेला विद्यमान संचालक मंडळाच्या कारभाराची वर्षपूर्ती होत आहे. बाजार समितीच्या आवारामध्ये संचालक मंडळाने केलेल्या कार्याचा आढावा घेतला असता या मंडळाचे पहिले वर्ष बऱ्याच अंशी यशस्वी राहिले असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. विद्यमान संचालक मंडळाच्या कार्यप्रणालीमुळे शेतकरी बांधव, व्यापारी, अडते, कर्मचारी आणि ग्राहक यांच्यात समाधानाचे वातावरण पाहायला मिळते.

मा आ विवेक पाटील यांच्या आशीर्वादाने तर शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंतभाई पाटील व माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या खमक्या मार्गदर्शनाने तसेच सुप्रसिद्ध उद्योगपती जे एम म्हात्रे व शेकाप पनवेल विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष काशिनाथ पाटील यांच्या सहकार्याने विद्यमान संचालक मंडळाची बिनविरोध निवड मागच्या वर्षी झाली होती. शेतकरी कामगार पक्षाचे माजी तालुका चिटणीस नारायण शेठ घरत हे सभापती पदी विराजमान झाले तर सुनील सोनावळे यांची उपसभापती नियुक्ती करण्यात आली. विशेष म्हणजे उर्वरित पंधरा संचालक पहिल्यांदाच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक झाले. म्हणूनच एकूण १७ संचालक असणार्या या मंडळाने सुरुवातीचे दोन महिने एकंदरीत कामकाज व बाजार समितीचे नियम-निकष समजून घेण्यावर भर दिला.

विद्यमान संचालक मंडळाचे उल्लेखनीय कार्य म्हणजे अत्यंत शानदार पद्धतीने दिमाखदार गणेशोत्सव साजरा करणे. कोरोना काळातील निर्बंधामुळे पनवेल कृषी उत्पन्न बाजार आवारातील सुप्रसिद्ध गणेशोत्सव मर्यादित स्वरूपामध्ये गेले काही वर्ष साजरा होत असे. नूतन संचालक मंडळाने सर्वांना एकत्र घेत अत्यंत नेत्रदीपक गणेशोत्सव साजरा केल्यामुळे त्यांच्यावर स्तुती सुमानांचा वर्षाव होत होता. त्यानंतर येणार्या दीपावली उत्सवामध्ये कर्मचाऱ्यांना भरीव सानुग्रह अनुदान दिल्यामुळे देखील विद्यमान संचालक मंडळाचे कौतुक होत होते. वास्तविक महाराष्ट्रातील अन्य बाजार समित्यांमधील कर्मचार्यांना सातवा वेतन आयोग लागू आहे. परंतु पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती मधील कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू होत असल्यामुळे त्यांना अल्प मोबदल्यावर नोकरी करावी लागते. या गोष्टीची सहानुभूतीपूर्वक दखल घेऊन विद्यमान संचालक मंडळाने कर्मचार्यांना भरीव सानुग्रह अनुदान दिले होते. विद्यमान संचालक मंडळाच्या या निर्णयाने कर्मचारी वर्गात समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१